# शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर
## दक्षिण अंबाझरी रोड अंधविद्यालयसमोर श्रद्धानंदपेठ, नागपूर ४४००२२
दूरध्वनी -0712-2458920; ईमेलiti.nagpur@dvet.gov.in;संकेतस्थळ: itinagpur.co.in


क्रमांकः– नियोजन / वृक्षतोड / दरपत्रक / 2025 / 2343 दिनांक :– 29 AUG 2025

## दरपत्रक सुचना (तिसरी वेळ)

शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथील AS&EF या व्यवसायाच्या कार्यशाळेच्या प्रस्तावित बांधकामाच्या ठिकाणी असलेली व वृक्ष संवर्धक, नागपूर महानगर पालिका, नागपूर यांनी वृक्षतोड करण्यासाठी परवानगी दिलेली विविध प्रकारची (Non – Heritage) उभी असलेली झाडे मुळासकट कापणे व उचल करणे यांचे दरपत्रक पध्दतीने विकी करणे करीता इच्छुक कंत्राटदाराचा सहभागाकरीता सदर सुचना प्रसिध्द करण्यात येत असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ) AS&EF या व्यवसायाच्या कार्यशाळेच्या प्रस्तावित बांधकामाच्या जागेमध्ये असलेली झाडे – 250 झाडे

ब) संस्थेच्या मुख्य प्रवेश द्वारा जवळ असलेली झाडे – 04 झाडे

एकूण 254 झाडे

## अटी व भार्ती

1) उपसंचालक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपुर या संस्थेतील परीसरामध्ये असलेल्या विविध प्रकारची उभी असलेली झाडे कटाई व झाडाची उचल करण्याबाबतचे ठरविल्याप्रमाणे दर **www.itinagpur.co.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील.

2) कांपणी करावयाच्या झाडांची कमित कमि किंमत ठरवून दिलेल्या किमतीपेक्षा ( ठरवून दिलेली किंमत रु. 39240/–) कमी नसावी. त्यापेक्षा अधिक किमतीचे दरपत्रक सादर करण्यात यावी.

3) सदर दरपत्रकधारकांनी आवश्यक ते दस्ताऐवज व नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहिल.

4) इच्छुक कंत्राटदारांनी दि. 30/08/2025 ते दि. 09/09/2025 (वेळ 15:00) या कालावधीत आवश्यक बाबींची पुर्तता करून विकी करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे यांची एकत्रित किंमत दरपत्रकामध्ये नमुद करावी.

5) उक्त नमुद कालावधीच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दरपत्रकाद्वारे विक्री करावयाची उभी असलेली अनु.क्र लिहिलेली झाडे कत्राटदार यांना पाहण्याची मुभा राहिल.

6) दरपत्रकामध्ये ज्या कत्राटदाराचे जास्तीत जास्त दर असेल तेच दरपत्रक अटी व शर्तीच्या अधिन राहून स्विकारण्यात येईल.

7) दरपत्रकाचे स्वीकृती नंतर झाडे कापणे व उचल करणे याची सुरूवात करावी लागेल. संपुर्ण झाडे कापणे व उचल करणे आणि संपुर्ण झाडांचा परीसर स्वच्छ करणे हे काम 15 दिवसात पुर्ण करावे लागेल. सदर कामास विलंब झाल्यास प्रतिदिवस रू 500/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

8) सदर झाडाची कटाई व उचल समितीच्या उपस्थितीमध्ये तसेच कार्यालयीन वेळेतच करणे बंधनकारक राहिल.

9) सदर कामाचे प्राप्त झालेले दर पत्रक व विकीची कार्यवाही कुठल्याही परीस्थितीत रद्द करण्याचे अधिकार उपसंचालक औ.प्र.संस्था नागपुर यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे.

10) दरपत्रके कार्यालयात सादर करतेवेळी लिफाफा लाखेने सिलबंद असावा व त्यावर दरपत्रकाचा कमांक व दरपत्रकाचा मजकुर नमुद करावा.

11)दि. 10/09/2025 रोजी दुपारी 12.00 वाजता दरपत्रके उघडून लिफाफावर समोरील कार्यवाही समिती करेल.

12)दरपत्रकासोबत रूपये 5000/- परतावा अनामत रक्कम जमा करावी लागेल.

13)एकुण 254 झाडे जमीनीपासून मुळासह कापूण त्यांची उचल करणे व साफसफाई करणे.

संपुर्ण झाडे मुळासकट कापणी केल्या नंतर झाडाच्या संपुर्ण फाद्यांची योग्य विल्हेवाट लावावी लागेल. च सदर परीसर स्वच्छ करावा लागेल. योग्य प्रकारे स्वच्छता न केल्यास आपल्या जमा असलेल्या अनामत रकमेतून वसूल केल्या जाईल.

सहपत्र : कापणी करावयाच्या झाडांची यादी

आपली विश्वासू

( एस. एस. कुळकर्णी )
उपसंचालक
शास. औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
नागपुर -22

प्रतिलीपी : 1) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर
2) मा. उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर
3) मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, नागपूर
4) मा. उद्यान अधिक्षक, नागपूर महानगरपालीका, नागपूर

# कापणी करावयाच्या झाडांची यादी

कामाचे नाव :– भासकिय औ.प्र.संस्था,नागपुर येथील ASEF या व्यवसायाच्या कार्य□ाळा इमारतीचे प्रस्तावित बांधकामाच्या ठिकाणी अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातिची(Non-Heritage) झाडे मुळासकट कापणे व उचल करणे.

| अ.क | झाडांचे नाव व संख्या | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | पळस / आडजात – 04 | रूपये<br>**5000 / –**<br>रूपये रोखीने जमा करावी लागेल.<br>(जमा केलेल्या रकमेची शासनाची रीतसर पावती मिळेल)<br>अनामत रक्कम कामपूर्ण झाल्यानंतर 15 दिवसाने परत करण्यात येईल. | |
| 2 | शिसम – 02 | | |
| 3 | सुबाभूळ – 196 | | |
| 4 | वेस्ट्राफॉर्म – 15 | | |
| 5 | सागवान – 05 | | |
| 6 | चिचबिलाई – 04 | | |
| 7 | भरड – 02 | | |
| 8 | बोर – 03 | | |
| 9 | पांजरा – 06 | | |
| 10 | शिवबाभुळ – 07 | | |
| 11 | महारूख – 01 | | |
| 12 | उंबर – 01 | | |
| 13 | रेनट्री – 01 | | |
| 14 | अशोका – 04 | | |
| 15 | सिंधी – 02 | | |
| 16 | काटेसावर – 01 | | |
| | **एकुण 254 झाडे** | | |

अशी **एकुण 254 झाडे** जमीनीपासून मुळासह कापूण त्यांची उचल करणे व साफसफाई करणे.

संपुर्ण झाडे मुळासकट कापणी केल्या नंतर झाडाच्या संपुर्ण फांद्यांची योग्य विल्हेवाट लावावी लागेल. च सदर परीसर स्वच्छ करावा लागेल. योग्य प्रकारे स्वच्छता न केल्यास आपल्या जमा असलेल्या अनामत रकमेतून वसूल केल्या जाईल.

( एस. एस. कुळकर्णी )
उपसंचालक,
शास.औ.प्र.संस्था, नागपुर